झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र.झोपुप्रा/मुकाअ/झोपुयो स्विकृती/२०१८/९७९
दिनांक :- ०२ MAR 2018

कार्यालयीन आदेश

## शुध्दीपत्रक

**विषय** :- झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव स्विकारणेबाबत प्राधिकरणाचे दि.१६/१०/२०१७ चे कार्यालयीन आदेश.

**संदर्भ** :- १. झो.पु.प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.१४१, दि.४/५/२०१३.
२. झो.पु.प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.१४४, दि.३१/८/२०१३.
३. झो.पु.प्राधिकरणाचे कार्यालयीन आदेश, दि.२/२/२०१५.
४. झो.पु.प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.१४४अ, दि.९/११/२०१५.
५. झो.पु.प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.१४४ब, दि.२८/१२/२०१५.
६. झो.पु.प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.१४४क, दि.२६/५/२०१६.
७. झो.पु.प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.१६८, दि.३१/१२/२०१५.

विषयांकित कार्यालयीन आदेशान्वये, झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव स्विकृतीबाबत कार्यपध्दती अवलंबविण्यात आलेली आहे. त्यानुसार परिपत्रक क्र.१४४ व त्यानंतर वेळोवेळी दिलेल्या सूचना / आदेश व पारीत केलेली परिपत्रके या आधारे सर्व विभागप्रमुखांचे स्वयंस्पष्ट होकारार्थी / नकारार्थी अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करून प्रस्ताव स्विकारणे / नाकारणे याबाबत संबंधित उपमुख्य अभियंता आवश्यक कार्यवाही करतील अशी तरतूद आहे. सदर कार्यवाही ठाणे शहरामधील प्राप्त झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्रस्तावांना ही लागू आहे. तथापि सदर आदेशात फक्त बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील नियम क्र.३३(१०) अंतर्गत प्राप्त होणारे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्रस्तावांचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

सदर आदेशामधील मुद्दा क्र.४ अ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. व ते आदेशाच्या दिनांकापासून लागू असतील.

"परिपत्रक क्र.१४४ व त्यानंतर वेळोवेळी दिलेल्या सूचना, आदेश व पारीत केलेली परिपत्रके या आधारे बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील नियम ३३(१०)



Nilam
upload & reply to this letter immediately.

J.T-282
14/3/18

व ठाणे महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली, १९९५ मधील नियम क्र.१६५, अॅपेंडिक्स-एस अंतर्गत प्राप्त होणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्तावावर सर्व विभागप्रमुखांचे स्वयंस्पष्ट होकारार्थी / नकारार्थी अभिप्राय संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंता, अभियांत्रिकी विभाग, झोपुप्रा यांचेकडे प्राप्त झाल्यानंतरच प्राप्त प्रस्तावाची छाननी करून प्रस्ताव स्विकारणेबाबत उपमुख्य अभियंता यांचेकडे टिपणी सादर करतील. प्रस्ताव स्विकारणे / नाकारणे याबाबत संबंधित उपमुख्य अभियंता आवश्यक कार्यवाही करतील."

(दीपक कपूर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रत,
सर्व विभाग प्रमुख / झोपुप्रा

प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
दूरध्वनी : २६५२६८००, २६५९०४०४ / १८७९, फॅक्स : ०२२-२६५९०४५७, ई-मेल : info@sra.gov.in

प्रत माहितीस्तव :-

१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक.
२) सचिव / झोपुप्रा यांचे स्वीय सहाय्यक.
३) वित्त नियंत्रक / झोपुप्रा.
४) मुख्य विधी सल्लागार / झोपुप्रा.
५) उपमुख्य अभियंता / झोपुप्रा, ठाणे
६) उपमुख्य अभियंता (१/२) / झोपुप्रा.
७) सहनिबंधक / झोपुप्रा.
८) उपजिल्हाधिकारी (१/२/३) / झोपुप्रा
९) उपजिल्हाधिकारी (१/२/३) / झोपुप्रा, ठाणे.
१०) कार्यकारी अभियंता / झोपुप्रा, ठाणे.
११) जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख / झोपुप्रा.
१२) सहाय्यक निबंधक / झोपुप्रा, ठाणे.
१३) प्रशासन विभाग / झोपुप्रा.
१४) प्रशासन विभाग / झोपुप्रा, ठाणे

/- सदर कार्यालयीन आदेश कार्यालयातील सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीबाबत या विभागास अवगत करावे.

१५) माहिती तंत्रज्ञान विभाग / झोपुप्रा

/- सदर कार्यालयीन आदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीबाबत या विभागास अवगत करावे.

१६) जनसंपर्क विभाग / झोपुप्रा

/- सदर कार्यालयीन आदेश कार्यालयातील सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीबाबत या विभागास अवगत करावे.

१७) निवड नस्ती